सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
गृह विभाग
कारागृह व सुधारसेवा विभाग

अपर पोलीस महासंचालक
व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
जुनी मध्यवर्ती इमारत, २ रा मजला,
पुणे-४११ ००१.
ई-मेल-igoffice.est1-mh@gov.in

दुरध्वनी ०२०-२६१२४८१५
फॅक्स ०२०-२६१२५८७८

**गोपनीय / परिपत्रक**

जा. क्र. डीईएस/आढावा/२०२४/कक्ष-३(१), पुणे-१ 1416 दिनांक 18/१०/२०२४

दि.१०/१०/२०२४ रोजी महाराष्ट्र कारागृह विभागाच्या आढावा बैठकीचे अनुषंगाने खालीलप्रमाणे सर्व संबंधीतांना सुचित करण्यात येते की,

**१.** विभागीय चौकशी नियमपुस्तिका १९९१ चौथी आवृत्ती मधील प्रकरण एक परिच्छेद क्र. १.८ नुसार प्राथमिक चौकशी शक्य तितक्या लवकर पुर्ण करण्यात यावी आणि कोणत्याही बाबतीत हा कालावधी निर्णय घेतल्याच्या तारखेपासून दोन महिन्यांपेक्षा अधिक असता कामा नये अशी तदतुद आहे. कारागृह अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द दोन महिन्यांपेक्षा जास्त कालावधीपासून प्रलंबित प्राथमिक चौकशी प्रकरणांचे प्रपत्र-अ सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. सदर प्रलंबित प्राथमिक चौकशी संबंधीतांनी पंधरा (१५) दिवसात पुर्ण करावी.

**२.** विभागीय चौकशी नियमपुस्तिका १९९१ चौथी आवृत्ती मधील प्रकरण तीन परिच्छेद क्र. ३.१९ नुसार विभागीय चौकशा शक्य तितक्या लवकर पूर्ण करण्यात याव्यात आणि कोणत्याही परिस्थितीत हा कालावधी विभागीय चौकशीचा निर्णय घेतल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांपेक्षा अधिक नसावा अशी तदतुद आहे. कारागृह अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द ६ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीपासून प्रलंबित विभागीय चौकशी प्रकरणांचे प्रपत्र-ब सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. सदर प्रलंबित विभागीय चौकशी संबंधीतांनी एक (०१) महिन्यात पुर्ण करावी.

**३.** फौजदारी प्रकरणातील व विभागीय चौकशी प्रकरणातील दोषारोप समकक्ष असल्यास अशा प्रकरणांचा आढावा घेऊन पुन्हा नव्याने दोषारोप तयार करुन विभागीय चौकशी आदेशीत करावी. फौजदारी गुन्हे प्रकरणातील आणि विभागीय चौकशीमधील दोषारोप हे वेगवेगळे असावेत. तसेच दोषारोप सुस्पष्ठ, नेमक्या, सारांश स्वरुपात असावेत जेणेकरुन ते सिध्द करता येणे शक्य होईल.

४. मध्यवर्ती कारागृह येथे अतिरिक्त अधीक्षक व उपअधीक्षक पदे पदोन्नतीने भरण्यात आलेली आहेत. यास्तव प्रलंबित विभागीय चौकशीची प्रकरणे नियमित अधीक्षकांकडे न देता अतिरिक्त अधीक्षक व उपअधीक्षक यांचेकडे सोपविण्यात यावेत. मात्र, प्रलंबित विभागीय चौकशी अंतिम टप्प्यात असेल तर अशी प्रकरणे अतिरिक्त अधीक्षक व उपअधीक्षक यांचेकडे वर्ग करण्यात येऊ नयेत.

५. अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द प्रलंबित विभागीय चौकशी प्रकरणे, प्राथमिक चौकशी प्रकरणे, फौजदारी गुन्हे तसेच निलंबित अधिकारी/कर्मचारी याबाबतची माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्र-क मध्ये प्रत्येक महिन्याच्या अखेरचे मासिक विवरणपत्र पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यंत न चुकता या कार्यालयास igoffice.de-mh@gov.in या ई-मेलवर सादर करावे.

18/10/25

**( प्रशांत बुरडे )**
अपर पोलीस महासंचालक,
महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

**प्रति,**

कारागृह उपमहानिरीक्षक (सर्व),
अधीक्षक, मध्यवर्ती / जिल्हा / खुले कारागृह (सर्व),
प्राचार्य, दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविदयालय येरवडा पुणे-६.
संपर्क अधिकारी, खुली वसाहत आटपाडी सांगली.
प्राचार्य, किशोर सुधारालय नाशिक.

**प्रत सादरः** मा. प्रधान सचिव, गृह विभाग (अ. व सु.), महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई.

## प्रपत्र-क

### प्राथमिक चौकशी / विभागीय चौकशी मासिक विवरणपत्र

माहे अखेर

| अ.क्र. | एकुण अपचारी अधिकारी/कर्मचारी नाव पदनाम व कार्यरत ठिकाण | कसुरी / दोषारोप | दोषारोप दिल्याचा दिनांक | दोषारोपाचे निवेदनाचा दिनांक | चौकशी अधिकारी नियुक्ती दिनांक | चौकशी अधिकारी नाव पदनाम | सादरकर्ता अधिकारी नाव पदनाम | प्राथमिक सुनावणी दिनांक | एकुण सरकारी साक्षीदार व बचावाचे साक्षीदार | तपासण्यात आलेल्या साक्षीदारांचा तपशील / फेरतपासणी / सरतपासणीचा दिनांकनिहाय तपशील | सादरकर्ता टाचण दिनांक / अपचारी अंतिम निवेदन | चौकशी अहवाल दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | |

### फौजदारी गुन्हे प्रकरणाचा तपशील मासिक विवरणपत्र

माहे अखेर

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी नाव पदनाम व कार्यरत ठिकाण | प्रकरणाचा तपशील | पोलीस स्टेशन | गुन्हा क्रमांक | कलम | सीआर नंबर | प्रकरणाची सदयस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

### निलंबित अधिकारी / कर्मचारी तपशील मासिक विवरणपत्र

माहे अखेर

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी नाव पदनाम व कार्यरत ठिकाण | प्रकरण | निलंबनाचा दिनांक | प्राथमिक चौकशी आदेशीत दिनांक | विभागीय चौकशी सुरु केल्याचा दिनांक | फौजदारी गुनहा दाखल आहे किंवा कसे | प्रकरणाची सदयस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |